# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरूवार, दिनांक ०६ मार्च, २०२५ / फाल्गुन १५, १९४६ शके

२०. शुक्रवार, दिनांक ०७ मार्च,२०२५ रोजी अशासकीय कामकाज (ठराव) घेण्यात येणार आहेत. अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम बॅलटद्वारे निश्चित करण्यात आला असून त्याबाबतची माहिती सर्व सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे देण्यात आली आहे. बॅलटद्वारा काढण्यात आलेल्या ५ अशासकीय ठरावांमधुन ४ अशासकीय ठराव चर्चेकरिता घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समिती नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी शुक्रवार, दिनांक ०७ मार्च,२०२५ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांचा वेळेपैकी १० मिनिटांचा वेळ पुर:स्थापनार्थ असलेल्या विधेयकांना व उर्वरित १४० मिनिटांचा वेळ चर्चेकरिता घेण्यात येणाऱ्या खालील नमूद ठरावांना देत आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) | डॉ. विश्वजित कदम, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - ९० | ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| (२) | श्रीमती मनिषा चौधरी,वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - १३० | ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| (३) | डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - २७ | ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| (४) | श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. ठराव क्रमांक – ०७ | ३५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

**वरीलपैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात येईल.**

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : ०६ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

(1)महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सदस्य
(2) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
(3) संगणक कक्ष (Website)